# संचालक, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा यांचे कार्यालय

मु.पो.ता.वैराट रोड, चिखलदरा ता.चिखलदरा जि.अमरावती पिन-444 807
ई-मेल-principal.mfrc933@gmail.com फोन नं.07220-230230


क्रमांक:कक्ष:-03/सं.व.प्र.सं.चि./शिलि/ 218 /2025-26 चिखलदरा 444 807, दिनांक:- 04/11/25

प्रति,
उप वनसंरक्षक,
( शिक्षण व प्रशिक्षण )
म.रा.पुणे.

**विषय**:- प्रत्येक महिण्याकरीता वन शैक्षणिक वार्ता सादर करणे बाबत.
**संदर्भ**:- आपले कार्यालयीन पत्र क्रमांक : कक्ष-1/प्रशिक्षण/187/2025-26 दिनांक 25/06/2025.

उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथील सरळ सेवा प्रविष्ठ नवनियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षणार्थी तुकडी क्रमांक 62 मधील प्रशिक्षणार्थींचे व वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे सुरु असलेले **कॅम्पा योजने** अंतर्गत वनपाल यांचे 30 दिवसीय व लिपीक / लेखपाल यांचे 45 दिवसीय पायाभुत प्रशिक्षण मधील प्रशिक्षणार्थींचे कार्यक्रम संबंधाने सुरु असलेल्या विविध प्रशिक्षण कार्यक्रमाचा दिनांक 01/08/2025 ते 31/08/2025 पर्यंतचा मासीक शैक्षणीक अहवाल सोबत सहपत्रीत करुन अवलोकनार्थ व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीस्तव सविनय सादर.

**सहपत्र**:- वरील प्रमाणे. ( पेज क्र. 1 ते 38 )

( कु. मुक्ताबाई वि. टेकाळे )
संचालक,
वन प्रशिक्षण संस्था,चिखलदरा.

**प्रतिलिपी** :- मा. अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संशोधन, शिक्षण व प्रशिक्षण) म.रा.चंद्रपूर यांना माहितीस सविनय सादर.

( कु. मुक्ताबाई वि. टेकाळे )
संचालक,
वन प्रशिक्षण संस्था,चिखलदरा.

Scanned with OKEN Scanner

# * प्रस्तावना *

वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा ही महाराष्ट्र राज्यातील वन विभागाच्या प्रशिक्षण क्षेत्रातील एक **अग्रगण्य व मान्यताप्राप्त** संस्था आहे. संस्थेमार्फत नव नियुक्त व कार्यरत वन कर्मचाऱ्यांना **गुणवत्तापूर्ण**, **व्यावसायिक** आणि **शिस्तबध्द** प्रशिक्षण प्रदान करण्याचे कार्य सातत्याने करण्यात येते.

**दिनांक** 29/03/2025 पासुन संस्थेमध्ये सरळ सेवा नव नियुक्त अप्रशिक्षित **वनरक्षक** प्रशिक्षणार्थी **तुकडी क्र**. 62 यांचे सहा महिन्याचे **निवासी प्रशिक्षण** सुरु करण्यात आले आहे. यासोबतच, **कॅम्पा योजना अंतर्गत** दिनांक 04/08/2025 **ते** 03/09/2025 **व** 04/08/2025 **ते** 17/09/2025 या कालावधीमध्ये **वनपाल** यांचे 1 महिण्याचे व **लिपीक** / **लेखापाल** यांचे 45 दिवसांचे पायाभूत प्रशिक्षण एकुण **दोन** सत्रांमध्ये आयोजीत करण्यात आले.

**दिनांक** 01/08/2025 **ते** 31/08/2025 या कालावधीत, संस्थेच्या आदरणीय **संचालक**, **कु**. **मुक्ताबाई वि**. **टेकाळे**, यांच्या सक्षम नेतृत्व व मार्गदर्शनाखाली प्रशिक्षणार्थींसाठी विविध शैक्षणिक, प्रात्यक्षिक, कौशल्यविकास व वनसंवर्धनास पूरक उपक्रम राबविण्यात आले. प्रशिक्षणाच्या गुणवत्तेस चालना देणारे आणि प्रशिक्षणार्थींचा सर्वांगीण विकासास हातभार लावणारे हे उपक्रम नियोजित व शिस्तबध्द पध्दतीने पार पडले.

सदर मासिक शैक्षणिक अहवालामध्ये दिनांक 01/08/2025 **ते** 31/08/2025 या कालावधीत राबविण्यात आलेल्या प्रशिक्षण उपक्रमांचा संक्षिप्त आढावा देण्यात आलेला आहे.

या अहवालाचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे प्रशिक्षण कार्यक्रमातील विविध शैक्षणिक व प्रात्यक्षिक घटकांची स्पष्ट, शिस्तबध्द आणि कालानुक्रमिक नोंद सादर करणे. या माध्यमातून संस्थेतील प्रशिक्षणाची कार्यपध्दती, प्रशिक्षणार्थींची प्रगती, सत्रांची परिणामकारकता, तसेच एकंदर शैक्षणिक वातावरण यांचा समावेश असलेली संपूर्ण माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचवणे अपेक्षित आहे.

हा अहवाल पुढील प्रशिक्षण सत्रांच्या नियोजनासाठी मार्गदर्शक करणारा असून, प्रशिक्षणाच्या गुणवत्ता नियंत्रणात तसेच धोरणात्मक निर्णय प्रक्रियेस सहाय्यक ठरेल. संस्थेमध्ये सुरु असलेल्या प्रशिक्षण उपक्रमांची पारदर्शक, संक्षिप्त व विश्लेषणात्मक माहिती या अहवालाच्या माध्यमातून प्रस्तुत करण्यात आलेली आहे.

# * अनुक्रमणिका *


| अ.क्र. | कार्यक्रमाचे नाव | पेज नं. |
|---|---|---|
| 01 | साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे, यांची जयंती. ( दि. 01/08/2025 ) | 3 |
| 02 | क्रांतीसिंह नाना पाटील, यांची जयंती. ( दि. 03/08/2025 ) | 4 |
| 03 | नवनियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 62 चा कोकण शैक्षणिक अभ्यास दौरा कार्यक्रम. ( दि. 04/08/2025 ते 14/08/2025 ) | 5 ते 9 |
| 04 | 79 वा स्वातंत्र्यदिन. ( दि. 15/08/2025 ) | 10 |
| 05 | वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 62 द्वितीय सत्र अभ्यासक्रम. ( दि. 18/08/2025 ते 28/08/2025 ) | 11 ते 12 |
| 06 | वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 62 यांना **GPS व GIS** या विषयावर प्रशिक्षण. | 13 |
| 07 | वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 62 द्वितीय सत्र लेखी परीक्षा. ( दि. 29/08/2025 ते 05/09/2025 ) | 14 |
| 08 | सौ. कमलाताई गवई यांची संस्थेला सदिच्छा भेट. (दि.22/08/2025) | 15 ते 16 |
| 09 | कॅम्पा योजना अंतर्गत वनपाल यांचे 30 दिवसांचे पायाभूत प्रशिक्षण. (दि. 04/08/2025 ते 03/09/2025 ) | 17 ते 30 |
| 10 | कॅम्पा योजना अंतर्गत लिपीक / लेखापाल यांचे 45 दिवसांचे पायाभूत प्रशिक्षण. (दि. 04/08/2025 ते 17/09/2025 ) | 31 ते 38 |

# 01. **साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे, यांची जयंती**. ( दि. 01/08/2025 )




वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे **दि**. 01/08/2025 **रोजी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे, यांची जयंती कु. मुक्ताबाई वि टेकाळे, संचालक,** वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा यांच्या हस्ते अत्यंत उत्साहात व आदरपूर्वक साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात मा. संचालक, यांच्या हस्ते अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेला माल्यार्पण व दीपप्रज्वलन करुन करण्यात आली.

अण्णाभाऊ साठे हे एक थोर साहित्यिक, लोककवी आणि समाजसुधारक होते. त्यांचा जन्म 1 ऑगस्ट 1920 रोजी वटेगाव, सांगली जिल्ह्यात झाला. त्यांनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून वंचित, शोषित आणि श्रमिक वर्गाचे दुःख मांडले. त्यांच्या लेखनात तमाशा, पोवाडे, लोककथा यांचा प्रभावी वापर दिसून येतो. **“ फकीरा ”** ही त्यांची सर्वात प्रसिध्द कादंबरी असून, ती शोषितांच्या लढ्याचे प्रतीक ठरली आहे.

**साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे, यांची जयंती** वन प्रशिक्षण संस्थेत साजरी करुन त्यांचे कार्य व विचार यांना उचित अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमामुळे उपस्थित अधिकारी, कर्मचारींमध्ये सामाजिक समतेबद्दल जागरुकता निर्माण झाली.

या कार्यक्रमाच्या माध्यमातून अण्णाभाऊ साठे यांच्या प्रेरणादायी जीवनातून सामाजिक समतेचा संदेश सर्वांपर्यंत पोहोचवण्यात आला. त्यांच्या कार्याचा सन्मान राखत जयंती उत्सव अत्यंत सन्मानपूर्वक व उत्साही वातावरणात साजरा करण्यात आला. अशा कार्यक्रमांतून संस्था सामाजिक बांधिलकी जपत आहे.

# 02. क्रांतीसिंह नाना पाटील, यांची जयंती. ( दि. 03/08/2025 )




वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथील नवनियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षणार्थी तुकडी क्र. 62 चे सर्व प्रशिक्षणार्थी यांनी दि. 03/08/2025 रोजी **क्रांतीसिंह नाना पाटील, यांची जयंती** अत्यंत उत्साहात व आदरपूर्वक साजरी केली. कार्यक्रमाची सुरुवात **क्रांतीसिंह नाना पाटील,** यांच्या प्रतिमेला माल्यार्पण व दीपप्रज्वलन करुन करण्यात आली.

**क्रांतीसिंह नाना पाटील, यांची जयंती** साजरी करण्यामागचा मुख्य उद्देश म्हणजे त्यांच्या देशभक्तीपूर्ण कार्याची आठवण करून देणे आणि नव्या पिढीसमोर त्यांच्या विचारांची आणि कार्याची प्रेरणा ठेवणे हा होता. या कार्यक्रमाच्या आयोजनामुळे उपस्थितांना नाना पाटील यांचे स्वातंत्र्य संग्रामातील महत्व, त्यांनी स्थापन केलेले स्वतंत्र सरकार, आणि सामान्य जनतेसाठी त्यांनी केलेले कार्य याबद्दल सखोल माहिती मिळाली.

कार्यक्रमामध्ये वक्त्यांनी त्यांच्या जीवनातील विविध पैलूंवर प्रकाश टाकला, ज्यामुळे उपस्थितांमध्ये राष्ट्राभिमानाची भावना वृध्दिंगत झाली. विद्यार्थ्यांनी आयोजीत केलेल्या या कार्यक्रमामुळे कार्यक्रमात उत्साह व उर्जा निर्माण झाली आणि त्यांच्या आयोजनातून नाना पाटील यांचे कार्य प्रभावीपणे साकार झाले.

एकूणच हा कार्यक्रम अत्यंत यशस्वी आणि प्रेरणादायी ठरला. क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या विचारांचे व देशसेवेच्या तत्वांचे महत्व अधोरेखित झाले. अशा प्रकारचे कार्यक्रम समाजामध्ये देशभक्ती आणि सामाजिक जाणीवा वाढविण्याचे माध्यम ठरतात. त्यामुळे भविष्यातही या जयंतीचे अधिक व्यापक आणि व्यापक स्वरुपात आयोजन करावे, असे सर्व उपस्थितांचे मत झाले.

# 03. नवनियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 62 चा कोकण शैक्षणिक अभ्यास दौरा कार्यक्रम. ( दि. 04/08/2025 ते 14/08/2025 )



वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथील नवनियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षणार्थी तुकडी क्र. 62 चे सर्व प्रशिक्षणार्थी यांचा दिनांक **04/08/2025 ते 14/08/2025** या कालावधी मध्ये **कोकण शैक्षणिक अभ्यास दौरा** आयोजित करण्यात आला होता. सदर कालावधी मध्ये सर्व प्रशिक्षणार्थी यांनी दौऱ्या दरम्यान खालील प्रमाणे विविध ठिकाणांवर भेट दिली.

| अ.क्र. | दिनांक व वार | भेटीचे ठिकाण | भेटीचे कारण |
|---|---|---|---|
| 01 | 04/08/2025 सोमवार | **व.प्र.सं.चिखलदरा ते छ. संभाजीनगर** | छ. संभाजीनगर मुक्काम. |
| 02 | 05/08/2025 मंगळवार | **छ. संभाजीनगर ते शिर्डी** | महादेववन बायोडायव्हर्सिटी पार्क सिध्दार्थ गार्डन, Eco-Battalion, वेरुळ लेणी. |
| 03 | 06/08/2025 बुधवार | **शिर्डी ते ओझर** | राहुरी विद्यापीठ येथील विविध प्रकल्पाचा अभ्यासुमाळशेज घाट परिसर ट्रेकींग. |
| 04 | 07/08/2025 गुरुवार | **ओझर** | शिवनेरी JFM, वनपरिक्षेत्र, जुन्नर, बिबिट निवारणकेंद्र मानिकडोह, जुन्नर शिवनेरी वनपर्यटन व ट्रेकिंग, SMC, रोपवाटीका, Dr. Alexander Gibson स्मारक, ओझार. |
| 05 | 08/08/2025 शुक्रवार | **ओझर ते जेजूरी** | Gibson संग्रहालय ओझर लेण्याद्री ट्रेकिंग. |
| 06 | 09/08/2025 शनिवार | **जेजूरी ते कुंडल** | बनेश्वर निसर्ग पर्यटन केंद्र, नसरापूर, सागरेश्वर अभयारण्य. |
| 07 | 10/08/2025 रविवार | **कुंडल ते अदमापूर** | तबक उद्यान पन्हाळा, Pug Mark Art Gallery. |
| 08 | 11/08/2025 सोमवार | **अदमापूर ते सावंतवाडी** | आंबोली वन पर्यटन केंद्र, नानाजी वेंगुर्ला कांदळवन. |
| 09 | 12/08/2025 मंगळवार | **सावंतवाडी ते पावस** | गावकडी कावस प्रजनन केंद्र, सुरु रोपवन, कांदळवन पावस. |
| 10 | 13/08/2025 बुधवार | **पावस** | परतीचा प्रवास. |
| 11 | 14/08/2025 गुरुवार | **पावस ते छ. संभाजीनगर** | छ. संभाजीनगर ते वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा परतीचा प्रवास. |


वन विक्री आगार फोंडा


08/07/2025, 11:22

# कोकण शैक्षणिक अभ्यास दौरा











08/07/2025, 14:14







# 04. 79 **वा स्वातंत्र्यदिन**. ( **दि**. 15/08/2025 )




वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे 15 **ऑगस्ट** 2025 रोजी देशाचा **79 वा स्वातंत्र्यदिन** अत्यंत उत्साहात आणि सन्मानपूर्वक साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास संस्थेच्या **संचालक, कु. मुक्ताबाई वि. टेकाळे,** यांच्या प्रमुख उपस्थितीत ध्वजारोहण करण्यात आले.

कार्यक्रमात कार्यालयातील सर्व अधिकारी, कर्मचारी, तसेच सत्र क्र. 62 चे सर्व प्रशिक्षणार्थी सहभागी झाले होते. यासोबतच कॅम्पा योजनेअंतर्गत सुरु असलेल्या प्रशिक्षणातील वनपाल व लिपिक / लेखापाल प्रशिक्षणार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ध्वजारोहणानंतर राष्ट्रगीत व देशभक्तिवर गीते सादर करण्यात आली. यानंतर संचालक, यांनी उपस्थितांना संबोधित करत स्वातंत्र्य दिनाचे महत्व, आपल्या जबाबदाऱ्या आणि पर्यावरण संवर्धनाचे महत्व अधोरेखित केले.

कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला आणि शेवटी सर्वांनी एकत्र येऊन सामूहिक छायाचित्र काढले. 79 वा स्वातंत्र्यदिन वन प्रशिक्षण संस्थेत अत्यंत शिस्तबध्द आणि उत्साही वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमामुळे देशभक्तीची भावना वृध्दिंगत झाली असून, सर्वांनी राष्ट्रप्रेम, कर्तव्यपरायणता आणि पर्यावरण संवर्धनाच्या दिशेने कार्य करण्याचा संकल्प केला. संचालक यांचे मार्गदर्शन प्रेरणादायी ठरले. एकूणच हा कार्यक्रम संघटनात्मक एकता आणि राष्ट्रीय भावना दृढ करणारा ठरला.

# 05. वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 62 द्वितीय सत्र अभ्यासक्रम.

## ( दि. 18/08/2025 ते 28/08/2025 )





वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथील नवनियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षणार्थी तुकडी क्र. 62 चे सर्व प्रशिक्षणार्थी दिनांक 14/08/2025 रोजी दौऱ्या वरुन आल्या नंतर प्रशिक्षणार्थींचे **द्वितीय सत्राचे** नियमीत पणे वर्ग चालु झाले. **दि. 18/08/2025 ते 28/08/2025** या कालावधी मध्ये प्रशिक्षणार्थींना द्वितीय सत्राचे खालील विषयांवर प्रशिक्षण देण्यात आले.

| सरळ सेवा प्रविष्ठ अप्रशिक्षीत वनरक्षक प्रशिक्षण सत्र क्र. 62 (कालावधी दि. 29/03/2025 ते 24/09/2025) | | | |
|---|---|---|---|
| **अ. क्र** | **विषय** | **व्याख्याते** | **विषयनिहाय माहिती** |
| 01 | **कवायत व खेळ** | श्री. एस.एस. आकेवार, कवायत शिक्षक, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा.<br>श्री. महादेव धुर्वे ( कत्रांटी क.शि. व.प्र.सं.चिखलदरा )<br>श्री. नितीन बघाये ( कत्रांटी क.शि. व.प्र.सं.चिखलदरा ) | **कवायत व खेळ** (Drill and Sports)<br>प्रशिक्षणार्थ्यांना शारीरिक क्षमतेसाठी दैनिक कवायत व विविध खेळांचे प्रशिक्षण देण्यात आले. यामध्ये पथसंचलन, व्यायाम, लष्करी शिस्त, तसेच फुटबॉल, व्हॉलीबॉल इत्यादी खेळांचा समावेश होता.<br>**उद्देश:**<br>शारीरिक तंदुरुस्ती, टीमवर्क, व शिस्त यांचे महत्त्व पटवून देणे. |
| 02 | **संगणक** | श्री. ए. बी. गेडाम, लिपीक, गुगामल वन्यजीव विभाग, चिखलदरा.<br>श्री. आनंद एस. पीडीयार, तालुका व्यवस्थापक, आपले सेवा केंद्र. पं.स. चिखलदरा. | **संगणक** (Computer)<br>प्रशिक्षणार्थ्यांना संगणकाचे मूलभूत ज्ञान देण्यात आले.<br>**अभ्यासाचे मुद्दे:** MS Office (Word, Excel, Power Point) ई-मेल व इंटरनेट वापर , वनविभाग संबंधित सॉफ्टवेअरचा उपयोग<br>**उद्देश:** कार्यालयीन कामकाजात तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर. |

| | | | |
|---|---|---|---|
| 03 | **वनव्यवस्थापन** | श्री. डॉ. श्रीकांत सोनोने. | **वनव्यवस्थापन(**Forest Management) वनसंपत्तीचे योग्य व्यवस्थापन कसे करावे याचे प्रशिक्षण दिले गेले.<br>**मुख्य मुद्दे:** वनीकरणाचे प्रकार, वनक्षेत्राची तपासणी, वृक्ष लागवड व संगोपन वनातील जैवविविधतेचे संरक्षण. |
| 04 | **वनसंरक्षण** | श्री. एस. बी. गुल्हाणे, उपसंचालक, (से.नि.) | **वनसंरक्षण(**Forest Protection) वनांचे संरक्षण व पर्यावरण संतुलन राखण्याचे महत्त्व समजावून देण्यात आले.<br>**प्रमुख बाबी:** अवैध वृक्षतोडीवर नियंत्रण, वन्यजीव संरक्षण, कायदे जनजागृती व सहभाग. |
| 05 | **व्यवस्थापकिय कौश्यल्य** | श्री. एस.एस. आकेवार, कवायत शिक्षक, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा. | **व्यवस्थापकीय कौशल्य (**Managerial Skills) वनरक्षक म्हणून आवश्यक नेतृत्व व व्यवहार कौशल्यांचे प्रशिक्षण.<br>**अभ्यासाचे भाग:** निर्णय घेणे, संकट व्यवस्थापन, संघटनकौशल्य, जनसंपर्क कौशल्य. |
| 06 | **वनउपयोगीता** | श्री. आर. बी. गिरी, वनपरिक्षेत्र अधिकारी (से.नि.) | **वन उपयोगिता (**Forest Utilization) वनसंपत्तीचा शाश्वत उपयोग कसा करावा हे शिकवण्यात आले.<br>**प्रमुख घटक:** इंधन, औषधी वनस्पती, बांबू, गवत यांचा उपयोग स्थानिक समुदायाचा सहभाग बाजारपेठेतील मागणी व पूर्ती व्यवस्थापन. |
| 07 | **संयुक्त वनव्यवस्थापन** | श्री. एस. बी. धर्माधिकारी, सहा. वनसंरक्षक (से.नि.) | **संयुक्त वन व्यवस्थापन (**Joint Forest Management JFM)<br>स्थानिक समुदाय व वनविभाग यांचा समन्वय साधून वनसंवर्धन करणे**.**<br>**मुख्य तत्त्वे:** ग्रामसभा व वन समित्यांची भूमिका हक्क व जबाबदाऱ्या फायदे वाटप यंत्रणा. |
| 08 | **लेखा व कार्यप्रणाली** | श्री. जी. बी. महाजन, लेखाअधिकारी (से.नि.) | **लेखा व कार्यप्रणाली (**Accounts and Procedure)<br>वनविभागातील आर्थिक व्यवहार व प्रशासकीय प्रक्रिया समजावून देण्यात आली. अभ्यासाचे भाग: लेखा पुस्तिका व नोंदी, सरकारी निधीचा उपयोग, बजेट तयार करणे, रिपोर्ट लेखन व सादरीकरण. |

## 06. **वनरक्षक प्रशिक्षणार्थी यांना GPS व GIS या विषयावर प्रशिक्षण**.




वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथील नवनियुक्त अप्रशिक्षित वनरक्षक प्रशिक्षणार्थी तुकडी क्र. 62 चे सर्व प्रशिक्षणार्थी यांना श्री. एन. व्हि. कुंभकर्ण, ( से.नि. सहा.वनसंरक्षक ) यांनी **GPS व GIS** या विषयावर प्रशिक्षण दिले.

वणरक्षक प्रशिक्षणार्थी यांना दिलेल्या **जी.पी.एस. (Global Positioning System)** आणि **जी.आय.एस. (Geographical Information System)** विषयावरील प्रशिक्षणामुळे त्यांच्या तांत्रिक ज्ञानात आणि क्षेत्रीय कार्यक्षमतेत लक्षणीय वाढ झाली आहे. या प्रशिक्षणातून प्रशिक्षणार्थींना जंगल क्षेत्राचे अचूक सर्वेक्षण, नकाशे तयार करणे, सीमारेषा ओळखणे, वनक्षेत्रातील बदलांचा मागोवा घेणे तसेच संसाधन व्यवस्थापनासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्याची कौशल्ये प्राप्त झाली. यामुळे वनसंवर्धन, वनसंपत्तीचे शाश्वत व्यवस्थापन आणि गुन्हे प्रतिबंध या सर्वच कार्यांमध्ये अचूकता, पारदर्शकता आणि कार्यक्षमता वाढली आहे. या प्रशिक्षणाचा परिणाम म्हणून वणरक्षक अधिक तांत्रिकदृष्ट्या सक्षम, जबाबदार आणि आधुनिक पद्धतीने कार्य करणारे झाले आहेत, ज्याचा थेट फायदा वन विभागाच्या उद्दिष्टपूर्तीस आणि पर्यावरण संवर्धनास होणार आहे.

## 07. वनरक्षक प्रशिक्षणार्थी सत्र क्र. 62 द्वितीय सत्र लेखी परीक्षा.

## ( दि. 29/08/2025 ते 05/09/2025 )





वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे दिनांक 29/08/2025 ते 05/09/2025 या कालावधीमध्ये सत्र क्र. 62 मधील सर्व प्रशिक्षणार्थ्यांची द्वितीय सत्राची लेखी परीक्षेचे आयोजन करण्यात आले. एकूण 92 प्रशिक्षणार्थी या परीक्षेमध्ये सहभागी झाले. ही परीक्षा संचालक, कु. मुक्ताबाई वि. टेकाळे, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा यांच्या मार्गदर्शनाखली यशस्वीपणे व नियोजनबध्द पध्दतीने पार पडली.

परीक्षेचे वेळापत्रक पूर्वनियोजित पध्दतीने तयार करण्यात आले. परीक्षेच्या संपूर्ण प्रक्रियेमध्ये शिस्त, पारदर्शकता आणि नियमानुसार कार्यवाही करण्यात आली. परीक्षा केंद्रावर आवश्यक त्या सर्व सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या.

सर्व संबंधित अधिकारी, कर्मचारी, पर्यवेक्षक यांनी आपापली जबाबदारी योग्य प्रकारे पार पाडली. परीक्षेच्या दरम्यान कोणताही अनुचित प्रकार आढळून आला नाही. प्रशिक्षणार्थ्यांनीही अत्यंत सकारात्मक व शिस्तबध्द सहभाग नोंदवून परीक्षेला सहकार्य केले.

# 08. सौ. कमलाताई गवई यांची संस्थेला सदिच्छा भेट. ( दि.22/08/2025 )



दिनांक 22 ऑगस्ट 2025 रोजी भारताचे मा. मुख्य सरन्यायाधीश मा. श्री. भुषण गवई यांच्या मातोश्री व माजी राज्यपाल स्व. रासु गवई यांच्या धर्मपत्नी **सौ. कमलाताई गवई** यांनी वन प्रशिक्षण संस्थेला सदिच्छा भेट दिली.

या प्रसंगी संस्थेच्या संचालक, कु. मुक्ताबाई वि टेकाळे, यांनी मातोश्री यांचे स्वागत केले आणि संस्थेच्या वतीने आभार व्यक्त केले.

**सौ. कमलाताई गवई** यांनी आपल्या मनोगतातून आयुष्यातील संघर्ष, मूल्ये व समाजसेवा याविषयी अत्यंत प्रभावी मार्गदर्शन केले. त्यांनी सांगितले की, स्वत: अत्यंत साध्या परिस्थितीतून आपल्या मुलाचे शिक्षण पूर्ण करुन त्यांना देशाच्या सर्वोच्च न्यायिक पदावर मुख्य सरन्यायाधीशपदावर पोहोचवले, हे त्यांच्या संयम, कष्ट आणि मूल्यनिष्ठ जीवनाचे फळ आहे. त्यांनी प्रशिक्षणार्थींना समाजासाठी काम करण्याचे व सेवा भावनेने कार्य करण्याचे आवाहन केले. समाजसेवा हीच खरी जीवनधर्म असल्याचे त्यांनी स्पष्ट सांगितले.

मातोश्री यांनी महिला प्रशिक्षणार्थींना विशेष संबोधित करताना, आई म्हणून आपल्या जबाबदाऱ्या कशा पार पाडाव्यात, यावरही भाष्य केले. त्यांनी सांगितले की, आई ही केवळ घरातील व्यक्ती नसून, ती संपूर्ण कुटुंबाचा आधारस्तंभ असते, तिच्या शिक्षणाने, संस्कारांनी आणि समर्पणातूनच मुलांचे भविष्य घडते. त्यांनी आपल्या अनुभवातून दाखवून दिले की, जर आई खंबीर असेल, तर तिचे मूल कितीही कठीण परिस्थितीतून का जाऊ दे, ते यशाच्या शिखरावर जाऊ शकते. या विचारांनी महिला प्रशिक्षणार्थींना आत्मविश्वास आणि प्रेरणा मिळाली.

मातोश्री यांनी प्रशिक्षणार्थींना पर्यावरण व वृक्ष लागवडीसंदर्भात संदेश देत असतांना सांगीतले की, वनसेवेत असताना पर्यावरण रक्षण हे सर्वात मोठे कर्तव्य आहे, याची जाणीव त्यांनी सर्व प्रशिक्षणार्थींना करुन दिली. त्यांनी विशेषत: सांगितले की, तुम्ही आता वनसेवेत आहातच, पण जिथे शक्य असेल तिथे जास्तीत जास्त वृक्ष लागवड करा, कारण हेच पर्यावरणाचे खरे रक्षण आहे. या विचारांनी प्रशिक्षणार्थींमध्ये पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण झाली.




सौ. कमलाताई गवई यांची सदिच्छा भेट वन प्रशिक्षण संस्थेसाठी अत्यंत प्रेरणादायी ठरली. त्यांच्या अनुभवसंपन्न व मार्गदर्शक विचारांमुळे प्रशिक्षणार्थींमध्ये सामाजिक, पारिवारिक व पर्यावरणीय जबाबदाऱ्या अधिक समजून घेण्याची मानसिकता विकसित झाली. त्यांच्या भेटीमुळे संस्था, आणि प्रशिक्षणार्थी दोघांनाही सकारात्मक ऊर्जा मिळाली असून, भविष्यातील कार्यासाठी ती निश्चितच उपयोगी ठरेल.

सौ. कमलाताई गवई यांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनानंतर संस्थेच्या संचालक, यांनी मन:पूर्वक आभारप्रद मनोगत व्यक्त केले. मा. संचालिका मॅडम यांनी मातोश्रींचे मनापासून आभार मानले आणि सांगितले की, मुलांवर योग्य संस्कार, शिक्षण व मूल्यांचे बीज पेरल्यास ते देशाच्या सर्वोच्च स्थानावर पोहोचू शकतात. हे आपण आज प्रत्यक्ष पाहिले. मातोश्री यांचे जीवन हे समर्पण, संघर्ष आणि सामाजिक बांधिलकी यांचे उत्तम उदाहरण आहे.

संचालक, यांनी मातोश्रींचे मार्गदर्शन हे प्रशिक्षणार्थींसाठी अमूल्य प्रेरणादायी ठरेल, असे नमूद करत त्यांचे पुन्हा एकदा संस्थेच्या वतीने आभार मानले. त्यांनी उपस्थित प्रशिक्षणार्थींना ही शिकवण आपल्या वैयक्तिक व व्यवसायिक जीवनात अंगीकरण्याचे आवाहन केले.

# 09. कॅम्पा योजना अंतर्गत वनपाल यांचे 30 दिवसांचे पायाभूत प्रशिक्षण.

## (दि. 04/08/2025 ते 03/09/2025 )

| अ. क्र | सत्र क्र. व दिनांक | संवर्ग | विषय | व्याख्याते | हजर प्रशिक्षणार्थी |
|---|---|---|---|---|---|
| 01 | 02 | 03 | 04 | 05 | 06 |
| 01 | **सत्र क्र. 01 दि. 04/08/25 ते 03/09/25** | **वनपाल** | 1. **कुरण विकास व व्यवस्थापन**:- गवत प्रजातीची ओळख, अखादय वनस्पतीची ओळख.<br>2. रान शेंगवर्गीय वनस्पतींची ओळख, अखादय वनस्पतीचे उच्चाटन.<br>3. रायमुनीया उच्चाटन नंतरची कार्यवाही.<br>4. गवत बीज संग्रहण, गवत बीज ब्रॉडकास्ट.<br>5. Preparation of Grassland management plan with estimate. | श्री. प्रा. जी. डी. मुरतकर. | 37 |
| | | | 6. **मृद व जलसंधारण**:- CCT, DCT, LBS स्थळनिश्चिती, कामाची आखणी अंदाजपत्रक व MB तयार करणे.<br>7. गॅबियन, मातीनाला बांध स्थळनिश्चिती, कामाची आखणी अंदाजपत्रक व MB तयार करणे.<br>8. CNB स्थळनिश्चिती, कामाची आखणी अंदाजपत्रक व MB तयार करणे.<br>9. SMC कामे. | श्री. अनिल लोखंडे, अभियंता. | |
| | | | 10. **महाराष्ट्र नागरी सेवा**:- (शिस्त व अपील) 1979 पदग्रहण अवधी.<br>11. महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) 1981. | कु. वैशाली दुधे, लेखापाल. | |
| | | | 12. महाराष्ट्र नागरी सेवा सेवाजेष्ठता नियम 2021.<br>13. भारतीय वन कायदा 1927 चे कलम 4 ते 20 वन जमाबंदी ची प्रक्रिया.<br>14. सेवा हक्क कायदा.<br>15. म.ना.से.कालबध्द प्रशिक्षण नियम 2022, ध्वज संहिता व राजमुद्रा वापरासंबंधी नियम. | श्री. काळकर, वनजमाबंदी अधिकारी. | |
| | | | 16. महाराष्ट्र नागरी सेवा नियम (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती).<br>17. महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) 1981. | श्री. विजय डहाळे, सहा. लेखा अधिकारी. | |
| | | | 18. NPS/UPS.<br>19. शासकीय कर्मचारी यांना मिळणारी अग्रिमे.<br>20. सेवापुस्तक.<br>21. शासकीय कर्मचारी यांना सेवेत असतांना व सेवानिवृत्ती नंतर मिळणारे लाभ. | श्री. ओमप्रकाश जाधव, सहा. लेखा अधिकारी. | |
| | | | 22. वर्तुळ अधिकाऱ्यांचे कार्ये महाराष्ट्र वन संहिता 2021.<br>23. नियतक्षेत्र तपासणी बाबत कार्यपध्दती.<br>24. महाराष्ट्र वन संहिता 2021, वनगुन्हे हाताळण्याबाबतची कार्यपध्दती.<br>25. वन सीमा माहिती व संरक्षण पध्दती.<br>26. भारतीय वन अधिनियम 1927 व सुधारणा 2023.<br>27. महाराष्ट्र वन नियमावली 2014.<br>28. वन्यजीव (संरक्षण ) अधिनियम 1972, सुधारणा 2023.<br>29. वन (संरक्षण एवं संवर्धन) अधिनियम 2023 (सुधारीत) ठळक तरतुदी.<br>30. अनुसुचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी ( वनहक्क मान्य करणे) अधिनियम, 2006 ठळक तरतुदी.<br>31. जैविक विविधता (सुधारीत) अधिनियम 2023 ठळक तरतुदी.<br>32. पर्यावरण संरक्षण अधिनियम 1986 ठळक तरतुदी.<br>33. वन अपराध तपास पध्दती.<br>34. नविन भारतीय नागरी सुरक्षा संहिता 2023 प्रमाणे आवश्यक तपासातील तरतुदी.<br>35. भारतीय साक्ष अधिनियम 2023 प्रमाणे आवश्यक तपासातील | श्री. एस.एम.जगताप (वि.व.अ. से.नि.) | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | तरतुदी.<br>36. दस्तावेज तयार करणे.<br>37. चमू निहाय दस्तावेज सादरीकरण व चर्चा. | | |
| | | | 38. Forest Fire Management.<br>39. FSI, Fire Alert System.<br>40. Crime Detection मध्ये Cyber Cell चे महत्व. | श्री. आकाश सारडा, वनरक्षक, रा. अमरावती. | |
| | | | 41. औषधी वनस्पती रानभाज्या व दुर्मिळ वनस्पती.<br>42. संस्थेतील औषधी व दुर्मिळ वनस्पतीची ओळख.<br>43. वन्यप्राणी विषयक अस्तित्व व पुरावे.<br>44. मानव वन्यजीव संघर्ष व उपाययोजना. | श्री. आर.बी.गिरी, (वअप.से.नि.) | |
| | | | 45. माहितीचा अधिकार अधिनियम 2005.<br>46. कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) अधिनियम 2013. | श्री. प्रा. राजेश पाटील, रा. अमळनेर. | |
| | | | 47. GPS & GIS. | श्री. एन.व्हि. कुंभकर्ण, (से.नि.स.व.स.) | |
| | | | 48. वनमिती.<br>49. रोपवने व कामकाज पध्दती.<br>50. रोपवाटीका. | श्री. एस. बी. गुल्हाने उपसंचालक. से.नि.) | |
| | | | 51. NLP ओळख व महत्व. | श्री. एस.एस. आकेवार. क.शि.व.प्र.सं.चिखलदरा. | |
| | | | 52. Self Awareness, Public Speaking & Presentation Skill.<br>53. Personality Development, Positive Attitude.<br>54. Communication Skill, Stress Management.<br>55. Time Management, Conflict Management, Emotional intelligence. | श्री. रागीब अहमद, (तज्ञ व्य.वि.) | |
| | | | 56. Online POR, Saw mill, Online TP, Maha Forest Portal.<br>57. SPMS, NMIS, PMIS All Application used in forest department. | श्री. मंगेश मनोहरे, रा. चिखलदरा. | |
| | | | 58. पदग्रहण अवधी.<br>59. म.ना.से. वर्तणूक नियम.<br>60. आस्थापने संबंधी शंका व निरसण. | श्री. जी. टी. महाजन, (लेखाधिकारी से. नि.) | |
| | | | 61. ईमारत बांधकाम साहित्य माहिती.<br>62. वनविभागातील विविध इमारत बांधकामाबाबत माहिती.<br>63. ईमारतीचे देखभाल व दुरुस्ती.<br>64. मोजमाप पुस्तिका.<br>65. बांधकाम प्रमाणके तयार करण्याची पध्दती. | श्री. एस. एम. सुरजुसे, (सवस.से.नि.) | |
| | | | 66. विषय निहाय PPT सादरीकरण. | कु. मुक्ताबाई वि. टेकाळे (संचालक, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा) | |
| | | | 67. क्षेत्रीय दौरा. | श्री. गुल्हाने सर. | |
| | **एकुण प्रशिक्षणार्थी** | | | | 37 |

**कॅम्पा योजना अंतर्गत वनपाल यांचे 30 दिवसांचे पायाभूत प्रशिक्षण लेखी परीक्षा.**

**( दि. 02/09/2025 )**





वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा येथे सुरु असलेल्या कॅम्पा योजने अंतर्गत वनपाल यांचे 30 दिवसांचे पायाभुत प्रशिक्षण ( प्रशिक्षणाचा कालावधी दि.04/08/2025 ते 03/09/2025) या कालावधीमध्ये आयोजित करण्यात आले होते. प्रशिक्षणाचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर प्रशिक्षणार्थ्यांची लेखी परीक्षा घेण्यात आली. या परीक्षेद्वारे प्रशिक्षणात दिलेल्या विषयांबाबत त्यांचे आकलन व प्रात्यक्षिक ज्ञान तपासण्यात आले. सदर लेखी परीक्षा ही **संचालक, कु. मुक्ताबाई वि. टेकाळे,** वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा यांच्या मार्गदर्शनास घेण्यात आली.

# वनपाल यांचे 30 दिवसांचे पायाभूत प्रशिक्षण.









## वनपाल यांचे 30 दिवसांचे पायाभूत प्रशिक्षण.








**वनपाल यांचे 30 दिवसांचे पायाभूत प्रशिक्षण दरम्यान सेमाडोह येथे क्षेत्रीय**





**वनपाल यांचे 30 दिवसांचे पायाभूत प्रशिक्षण दरम्यान चिखलदरा वन उद्यान येथे क्षेत्रीय दौरा**



**वनपाल यांचे 30 दिवसांचे पायाभूत प्रशिक्षण दरम्यान संस्थेतील औषधी वनस्पतींची ओळख**





# वनपाल यांचे 30 दिवसांचे पायाभूत प्रशिक्षण





# वनपाल यांचे 30 दिवसांचे पायाभूत प्रशिक्षण ( NLP Session )







# वनपाल यांचे 30 दिवसांचे पायाभूत प्रशिक्षण ( योगा परेड )







# वनपाल यांचे 30 दिवसांचे पायाभूत प्रशिक्षण







# वनपाल यांचे 30 दिवसांचे पायाभूत प्रशिक्षण









# वनपाल यांचे 30 दिवसांचे पायाभूत प्रशिक्षण








# वनपाल यांचे 30 दिवसांचे पायाभूत प्रशिक्षण दरम्यान विषय निहाय PPT सादरीकरण










प्रशिक्षणार्थींचे 30 दिवसीय पायाभुत प्रशिक्षण पुर्ण झाले असुन सदर प्रशिक्षणार्थींचा **प्रमाणपत्र** वितरण समारंभ व **निरोप समारंभ** कार्यक्रम घ्येण्यात आला. सदर प्रशिक्षणार्थींचा प्रमाणपत्र वितरण समारंभ कार्यक्रम हे **संचालक, कु. मुक्ताबाई वि. टेकाळे,** वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा यांच्या हस्ते घेण्यात आला.

## 10. कॅम्पा योजना अंतर्गत लिपीक / लेखापाल यांचे 45 दिवसांचे पायाभूत प्रशिक्षण. ( दि. 04/08/2025 ते 17/09/2025 )

| अ. क्र | सत्र क्र. व दिनांक | संवर्ग | विषय | व्याख्याते | हजर प्रशिक्षणार्थी |
|---|---|---|---|---|---|
| 01 | 02 | 03 | 04 | 05 | 06 |
| 01 | **सत्र क्र. 02 दि. 04/08/25 ते 17/09/25** | **लिपीक/ लेखापाल** | 1. वनविभागातील विविध लेखाशिर्ष व त्यांची माहिती.<br>2. बिम्स प्रणाली.<br>3. बिल पोर्टल मेडीकल बिल, प्रवासभत्ता बिले.<br>4. सेवार्थ प्रणाली.<br>5. अर्थसंकल्प.<br>6. PFMS. | श्री. ए.बी. गेडाम, लिपीक. | 20 |
| | | | 7. वेतन निश्चिती.<br>8. टिप्पणी लेखन व पत्र मसुदा.<br>9. निवृत्तीवेतन प्रकरणे तयार करणे.<br>10. निवृत्तीवेतन वेतनवाहिनी, वेतनीका, कोषवाहिनी.<br>11. शासकिय कर्मचाऱ्यांना सेवेत असतांना व सेवानिवृत्ती नंतर मिळणारे लाभ.<br>12. NPS/UPS.<br>13. शासकिय कर्मचाऱ्यांना मिळणारी अग्रिमे.<br>14. म.ना.से. ( वेतन ) नियम 1981 (वेतन निश्चिती).<br>15. सेवानिवृत्ती विषयक लाभ (Pensioner Benefits) i.e. Pension, DCRG, Leave Encampment, Pension Commutation, GPF, GIS.<br>16. म.ना.से. ( रजा ) नियम 1982 रजा लेखा तयार करणे.<br>17. महाराष्ट्र भविष्य निर्वाह निधी नियम 1998 लेखा तयार करणे. | श्री. ओमप्रकाश जाधव, सहा. लेखा अधिकारी. | |
| | | | 18. महाराष्ट्र कोषागार नियम.<br>19. महाराष्ट्र आकस्मीक खर्च, नियम.<br>20. मुंबई वित्तीय नियम व वित्तीय अधिकार.<br>21. भविष्य निर्वाह नियम.<br>22. अर्थसंकल्प.<br>23. भांडार, जडसंग्रह व निर्लेखन.<br>24. वैद्यकिय खर्च प्रतिपुर्ती देयके.<br>25. गटविमा योजना.<br>26. रोखपुस्तक.<br>27. महाराष्ट्र नागरी सेवा नियम. (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती)<br>28. स्थायित्व प्रमाणपत्र व स्वग्राम रजा प्रवास सवलत.<br>29. म.ना.से. (रुजु कालावधी)<br>30. न्यायालयीन प्रक्रिया व कामकाज. | श्री. विजय डहाळे, सहा. लेखा अधिकारी. | |
| | | | 31. पदग्रहण अवधी, सेवापुस्तकात घ्यावयाच्या नोंदी.<br>32. महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) 1981. | कु. वैशाली दुधे, लेखापाल. | |
| | | | 33. जंगल कामगार सहकारी संस्था, व त्यांचे कार्य.<br>34. कुप काम, विक्री व इमारती मालाचा लेखा. | श्री. पी.एन. कैदलवार, वनमजुर. | |
| | | | 35. औषधी वनस्पती रानभाज्या व दुर्मिळ वनस्पती.<br>36. संस्थेतील औषधी व दुर्मिळ वनस्पतीची ओळख. | श्री. आर. बी. गिरी, वपअ.से.नि. | |
| | | | 37. भारतीय वन अधिनियम 1927.<br>38. वन्यजीव संरक्षण अधिनियम 1972 सुधारीत 2023.<br>39. महाराष्ट्र वृक्षतोड (विनियमन ) 1964 सुधारीत 2023.<br>40. वन्यप्राणी हल्याची नुकसान भरपाई प्रकरणे हाताळणे.<br>41. वन (संरक्षण एवं संवर्धन) अधिनियम 2023 अंतर्गत प्रस्ताव.<br>42. वन गुन्हे प्रकरणी करावयाची कार्यवाही.<br>43. न्यायालयीन प्रकरणे हाताहतांना घ्यावयाची काळजी. | श्री. एस.एम. जगताप, विवअ. से.नि. | |
| | | | 44. NLP ओळख आणि महत्व. | श्री. एस.एस.आकेवार, कवायत शिक्षक, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा. | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | 45. माहितीचा अधिकार अधिनियम 2005.<br>46. कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई, आणि निवारण) अधिनियम 2013. | प्रा. राजेश पाटील, रा. अमळनेर. | |
| | | | 47. महाराष्ट्र सेवा हमी कायदा व कार्यपध्दती.<br>48. महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणुक ) नियम.<br>49. निलंबन - कारणे/ कार्यपध्दती/नियम.<br>50. विभागीय चौकशी, दोषारोप पत्र तयार करणे.<br>51. विभागीय चौकशी, सादरकर्ता अधिकारी नेमणूक व त्यांचे कर्तव्ये.<br>52. विभागीय चौकशी, पूर्व व चौकशी पुर्ततेनंतर कार्यवाही.<br>53. संवाद कौशल्य व अभिप्रेरणा.<br>54. वेळेचे महत्व, संघबांधणी.<br>55. JFM समितीचे रोखलेखा व त्याचे नियम.<br>56. नस्ती व्यवस्थापन व नस्ती व्यवस्थापनातील ABCD.<br>57. झिरो पेंडन्सी.<br>58. ऑडिट पॅरा लिहिणे व संपादीत करणे.<br>59. रोपवन मुल्यांकन अहवाल व आक्षेप पुर्तता.<br>60. How To Deal With People & Boss. | श्री. एस.बी. धर्माधिकारी सवस.से.नि. | |
| | | | 61. सेवार्थ प्रणाली. | श्री. नितेश होळकर. | |
| | | | 62. Self Awareness, Public Speaking & Presentation Skill.<br>63. Personality Development, Positive Attitude.<br>64. Communication Skill, Stress Management.<br>65. Time Management, Conflict Management, Emotional Intelligence. | श्री. रागीब अहमद, तज्ञ, व्य.वि. | |
| | | | 66. E-Auction.<br>67. Personal Hygiene. | कु. अरुना राठोड | |
| | | | 68. सेवा जेष्ठता, आकृतीबंध, बिंदूनामावली.<br>69. E-Tender.<br>70. सहा गठ्ठे पध्दती.<br>71. वैद्यकिय खर्चाची प्रतिपुर्ती.<br>72. रोकडवही मार्गदर्शक सुचना.<br>73. भांडार, खरेदी प्रक्रिया.<br>74. शंका व निरसन.<br>75. कार्यालयीन कामकाज पध्दती. | श्री. जी. टी. महाजन, लेखाधिकारी से.नि. | |
| | | | 76. कुप काम, विक्री व इमारती मालाचा लेखा. | श्री. एस.एस. बिजागरे, लेखापाल, से.नि. | |
| | | | 77. डिजिटल डॉक्युमेंट आणि कम्युनिकेशन मॅनेजमेंट, ई-मेल व्यवस्थापन व व्हॉट्सॲप दस्ताऐवज व्यवस्थापन.<br>78. सॉप्ट कॉपींचे व्यवस्थापन, क्लाऊड स्टोरजचा वापर व स्पीच-टू-टेक्स्ट.<br>79. गुगल शीट्सचा वापर, आर्टिफिशियल इंटेलिजन्स (AI) चा वापर व मेल अर्ज.<br>80. एम एस एक्सेल चा वापर व गुगल फॉर्म्सचा वापर. | श्री. आनंद ढगे. | |
| | | | 81. विषय निहाय PPT सादरीकरन. | कु. मुक्ताबाई वि. टेकाळे (संचालक, वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा) | |
| | | | 82. क्षेत्रीय दौरा. | श्री. गुल्हाने सर | |
| | | | | **एकुण प्रशिक्षणार्थी** | **20** |

लिपीक / लेखापाल यांचे 45 दिवसांचे पायाभूत प्रशिक्षण.







## लिपीक / लेखापाल यांचे 45 दिवसांचे पायाभूत प्रशिक्षण शैक्षणिक दौरा.







## लिपीक / लेखापाल यांचे 45 दिवसांचे पायाभूत प्रशिक्षण.






## लिपीक / लेखापाल यांचे 45 दिवसांचे पायाभूत प्रशिक्षण दरम्यान PPT सादरीकरण.










## लिपीक / लेखापाल यांचे 45 दिवसांचे पायाभूत प्रशिक्षण. (NLP Session / योगा परेड )







## लिपीक / लेखापाल यांचे 45 दिवसांचे पायाभूत प्रशिक्षण.







प्रशिक्षणार्थींचे 45 दिवसीय पायाभुत प्रशिक्षण पुर्ण झाले असुन सदर प्रशिक्षणार्थींचा **प्रमाणपत्र** वितरण समारंभ व **निरोप समारंभ** कार्यक्रम घेण्यात आला. सदर प्रशिक्षणार्थींचा प्रमाणपत्र वितरण समारंभ कार्यक्रम हे **मा. संचालक, कु. मुक्ताबाई वि. टेकाळे,** वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा यांच्या हस्ते घेण्यात आला.